# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १५.०५.२०२६ शुक्रवार**

**मा. पोलीस महासंचालक यांचे हस्ते ''गुणात्मक अन्वेषनासाठी सर्वात्कृष्ठ प्रयत्न'' करीता नागपूर शहर, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार :—**

मा. पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून नागपुर शहर पोलीस आयुक्तलयाला ''गुणात्मक अन्वेषनासाठी सर्वात्कृष्ठ प्रयत्न'' चा बहुमान मिळाला आहे. नागपूर शहरातील पोलीस ठाणे सदर हद्यीतील राजनगर येथे झालेल्या तीन कोटी रुपयांची घरफोडी या गुन्हयाचा तपास मोठ्या शिताफीने व बुध्दीचातुर्याने करुन, अभिलेखावरील दोन सराईत गुन्हेगार यांना अटक केली. आरोपीतांकडुन तीन कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा मुद्येमाल हस्तगत करण्याची उत्कृष्ट कामगिरी नागपुर शहर गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेऊन, सदरील गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आणला होता. नमुद उत्कृष्ट तपासाची दखल महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांनी तसेच, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी घेतली असता ''गुणात्मक अन्वेषनासाठी सर्वात्कृष्ठ प्रयत्न'' याकरीता निवड केली. यानिमीत्ताने मा. पोलीस महासंचालक यांनी दिनांक १५.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे पोनि. श्री. ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि. सचिन भोंडे, राजाभाऊ जाधव, पोहवा. रवि अहेर यांना पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई येथे शासकीय कार्यक्रमादरम्यान प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. यामुळे महाराष्ट्र राज्यातुन नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाची मान उंचावली आहे. याप्रसंगी नागपूर शहर पोलीस आयुक्त मा. श्री डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी गुन्हेशाखा, युनिट क्र. १ चे प्रशस्तीपत्र प्राप्त अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.






(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १४.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ९२,८१०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून २,१९५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७९५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,७८,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १४.०५.२०२६ चे १६.३० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे नागपूर शहरात पेट्रोलिंग करीत असता, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, उमिया कॉम्प्लेक्स समोर, शिव मंदीर जवळ, भंडारा—नागपूर हायवे रोडलगत एक अशोक लेलॅन्ड कंटेनर ट्रक क्र. यु.पी. ८१ ई. टी. ९००४ व मारूती स्वीफ्ट डिझायर कार क्र. एम.एच. ३१ एफ.सी. ८८३८ मध्ये काहीतरी संशयास्पद देवाण—घेवाण होत असल्याचे दिसून आल्याने, ट्रक चालक व स्वीफ्ट कारमधील ईसमांना ताब्यात घेवुन, पंचासमक्ष त्यांची व वाहनांची झडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातील कंटेनर ट्रक व कारमध्ये एकुण ३४ किलो गांजा मिळून आला. आरोपी १) ट्रक चालक नामे सय्यद सुमेल सय्यद इस्माईल, वय २९ वर्षे, रा. जगदंबा ले—आऊट, शिरपूर, कामठी, जि. नागपूर, २) मोहम्मद अनस सय्यद हिदायतुल्ला, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. १२५, बंसी नगर, हिंगणा रोड, नागपूर ३) रवि उदयसिंग शाहु, वय ३० वर्षे, बंसी नगर, मुन्ना शहा यांचे घरी किरायाने, हिंगणा रोड, नागपूर ४) अनिकेत गजानन गायनेर, वय २७ वर्षे, रा. गजानन नगर, हिंगणा रोड, नागपूर ५) अमन निमराज गायधने, वय २७ वर्षे, रा. संजय नगर, हिंगणा रोड, नागपूर ६) आकाश संजय विठोले, वय २७ वर्षे, रा. आंधळगाव, ता. मोहाडी, जि. भंडारा यांचे ताब्यातून ३४ किलो गांजा, ८ मोबाईल फोन, कंटेनर ट्रक व स्वीफ्ट कार असा एकुण २९,०५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपींना गांजाबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी बिजयकुमार बहेरा, रा. रेडापूर, संभलपूर, ओरीसा याचेकडून आणल्याचे सांगीतले. आरोपी यांनी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(ब), २०(ब)(ii)(क), २९ एन.डी.पी.एस. अ‍ॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पारडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ ते ६ यांना पुढील कारवाईकरीता मुद्देमालासह पारडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री.

राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. गजानन गुल्हाने, सपोनि. संदीप जाधव व त्यांचे पथकाने केली.

**<u>३) वाडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक १४.०५.२०२६ चे १७.५५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी माहिती मिळाली की, नरू पांडे नावाचा हद्दपार ईसम हा एम.एस.ई.बी. ऑफीस समोर, आठवा मैल, वाडी येथे फिरत आहे. अशा प्राप्त माहितीवरून, वाडी पोलीसांनी आठवा मैल परिसरात पाहणी केली असता, त्यांना प्राप्त वर्णनाचा ईसम दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नरेंद्र उर्फ नरू रामलिखावण पांडे, वय ३२ वर्षे, रा. रामजी आंबेडकर नगर, दिनेश बेले आटा चक्की मागे, आठवा मैल, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय.डी.सी. विभाग) वपोनि. राजेश तटकरे यांचे मार्गदर्शानाखाली, पोउपनि. अमित बंडगर, पोहवा रोशन फुकट, दुर्गादास माकडे, राहुल बोटरे व पोअं. विनोद कुंभलकर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे पारडी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १४.०५.२०२६ चे १५.०५ वा. ते १६.३० वा. चे दरम्यान, पारडी पोलीसाचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे पारडी हद्दीत, गस्त करीत असतांना त्यांना नाका नं. ०५, भंडारा रोड येथून एक महेंद्रा बोलेरो पिकअप चारचाकी वाहन क्र. एम.एच. ४० ए.के. ४८८७ हे वाहन भंडाराकडून नागपूरचे दिशेने धोकादायकरित्या, भरधाव वेगाने व संशयीतरित्या जातांना दिसून आले. बिट मार्शलनी बोलेरो पिकअपचा पाठलाग करून वाहन थाबविले. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये ०२ गायी व ०३ वासरे असे एकुण ०५ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव शुभम नरेंद्र लांजेवार, वय २७ वर्षे, रा. शास्त्री वार्ड, गणेशपूर, ता. जि. भंडारा असे सांगितले. गोवंशीय जनावरांबाबत विचारपूस केली असता, जनावरे त्याचा मामा नामे कुंडलिक आंबेडकर, रा. पारडी याचे मालकीचे असून, त्यांनी कोंढा, ता. पवनी, जि. भंडारा येथून विकत आणल्याचे व कळमना मार्केट येथे विक्रीकरीता नेत असल्याचे सांगितले. आरोपीस नमुद जनावरांबाबत कागदपत्रे मागीतली असता, त्याने कोणीतीही वैद्य कागदपत्रे न देता उडवा—उडवीचे उत्तरे दिली. आरोपी हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०५ गोवंशीय जनावरांची सुटका करून, त्यांना गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. अनुप कावळे, नेमणुक पो. ठाणे पारडी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. पोवार ९१४६९९३६२६ यांनी आरोपींविरूध्द सहकलम ३ भा.न्या.सं., सहकलम ३, ११(१)(ड), ११(१)(ई), ११(१)(फ) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६०, सहकलम ४७(अ), ४७(ब) प्राणी परीवहन नियम–१९७८, सहकलम ११९ म.पो.का., सहकलम ११३, १९४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**